**ठळक बातम्या**

- येत्या २० वर्षांत जागतिक पातळीवर ऊर्जेच्या वाढत्या मागणीत ३५ टक्के वाटा भारताचा असेल, असा आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेचा अंदाज

- राज्यसभेत आज वंदे मातरमच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्तच्या चर्चेचा समारोप

- शेतमाल आणि कापसाला वाजवी हमीभाव या मुद्द्यावर महाराष्ट्र विधानसभेत प्रचंड गदारोळ

- अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हनं केली प्रमुख व्याजदरात पाव टक्के कपात

आणि

- गोवा नाइट क्लब आग प्रकरणी आरोपी लुथरा बंधूंना थायलंडमधे अटक

**<><><><><>**

भारताचा ऊर्जेचा वापर वेगाने वाढत असून येत्या २० वर्षांत जागतिक पातळीवर ऊर्जेच्या वाढत्या मागणीत ३५ टक्के वाटा भारताचा असेल, असा अंदाज आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेनं वर्तवला आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी आज लोकसभेत पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात ही माहिती दिली. ऊर्जा आयातीवर भारत सध्या वर्षाला १५० अब्ज डॉलर खर्च करत असल्याचंही त्यांनी सांगितलं.

पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉलचं मिश्रण केल्यानं भारताचं कार्बन उत्सर्जन ७३६ लाख मेट्रिक टनांनी कमी झाल्याची माहिती रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज लोकसभेत दिली. प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान पुरवणी प्रश्नाला ते उत्तर देत होते.

***होल्ड... बाईट- नितीन गडकरी***

विकसित देश होण्यासाठी इंधन तेल आयात कमी करण्यची गरज असल्याचं मत गडकरी यांनी मांडलं.

लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्यासंदर्भातल्या संसदीय समितीचा कार्यकाळ लोकसभेनं आज वाढवला. पुढच्या वर्षीच्या अर्थसंकल्पीय

अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत कार्यकाळ वाढवण्याचा प्रस्ताव समितीचे अध्यक्ष पी. पी. चौधरी यांनी मांडला आणि लोकसभेनं तो आवाजी मतदानानं मंजूर केला.

<><><><><>

वंदे मातरम हा देशाचा आत्मा जागृत करण्याचा मंत्र आणि देशाच्या पुनर्निर्माणाचं आवाहन आहे, असं प्रतिपादन राज्यसभेचे सभागृह नेते जे. पी. नड्डा यांनी केलं. वंदे मातरम या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त चर्चेचा समारोप करताना ते बोलत आहेत. या चर्चेत ८० पेक्षा जास्त खासदारांनी भाग घेतला असून स्वातंत्र्यसंग्राम न पाहिलेल्या आजच्या तरुण पिढीला या चर्चेद्वारे याबाबत सखोल माहिती मिळेल आणि भविष्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तत्पूर्वी, दिवाळीचा समावेश युनेस्कोच्या अमूर्त वारसा यादीत झाल्याबद्दल आज राज्यसभेच्या सदस्यांनी आनंद व्यक्त केला. देशात डिजिटल पत्ता प्रणाली सुरू करण्यासाठी सरकार काम करत आहे, अशी माहिती सरकारनं आज राज्यसभेत दिली. न्यायपालिकेची स्वायत्तता अबाधित राखणं आणि न्यायदानासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, अशी ग्वाही कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी आज दिली. याबाबत विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते.

<><><><><>

शेतमाल आणि कापसाला वाजवी हमीभाव या मुद्द्यावर महाराष्ट्र विधानसभेत विरोधकांनी आज प्रचंड गदारोळ केला. पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे, विरोधकांनी हौद्यात उतरून निषेधाच्या घोषणा दिल्या. या मुद्द्यावर अध्यक्षांनी आपल्या दालनात दुपारी बैठक बोलावली, मात्र सरकारने सभागृहातच उत्तर द्यावं असा आग्रह विरोधकांनी धरला. निषेधाच्या घोषणा देत विरोधकांनी सभात्याग केला.

<><><><><>

नाबार्ड, अर्थात राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेनं, 'ग्रामीण आर्थिक परिस्थिती आणि भावना' या विषयावर नुकत्याच केलेल्या एका सर्वेक्षणात, ग्रामीण भागातल्या मागणीमध्ये सातत्यानं सुधारणा होत असल्याचं दिसून आलं आहे. यामधून गेल्या वर्षभरात ग्रामीण भागात कुटुंबांचं उत्पन्न आणि जीवनमान स्थिती सुधारत असल्याचे संकेत मिळत असल्याचं अर्थमंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

चालू वर्षात ग्रामीण भागातल्या ८० टक्के कुटुंबांची उपभोग्य वस्तूंची मागणी गेल्या वर्षाच्या तुलनेत वाढली असून, मासिक उत्पन्नाच्या ६७ टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम यावर खर्च होत आहे. तसंच ४२ पूर्णांक २ दशांश टक्के कुटुंबांच्या उत्पन्नात वाढ असून, जीएसटी दरातल्या सुधारणांमुळे हे शक्य झाल्याचं यात म्हटलं आहे.

<><><><><>

न्यायव्यवस्थेत एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या एआय समितीची पुनर्रचना करायचा निर्णय सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी घेतला आहे. पाच सदस्यांच्या या समितीचं नेतृत्व न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह यांच्याकडे असेल. न्यायदानाच्या प्रक्रियेची कार्यक्षमता आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा कसा वापर करता येईल, याबाबत ही समिती विचार करणार आहे.

<><><><><>

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह बँकेनं आपल्या प्रमुख व्याजदरात पाव टक्के कपात केली असून, २०२२ साला नंतरचा हा नीचांकी स्तर आहे. व्याजदर पातळी ३ पूर्णांक ५ दशांश, ते ३ पूर्णांक ७५ शतांश टक्के, या टप्प्यात कायम राखण्याचं बँकेचं उद्दिष्ट आहे.

फेडरल रिझर्व्हनं सप्टेंबर महिन्यापासून सलग तिसऱ्यांदा व्याज दर कपात केली असून, या वर्षभरात एकूण ७५ शतांश टक्के कपात झाली आहे. अमेरिकेतली वाढती महागाई आणि रोजगार निर्मितीमधली मंदी, या पार्श्वभूमीवर बँकेनं हा निर्णय घेतल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

<><><><><>

उत्तर प्रदेश आणि हरियाणा या राज्यांमधलं प्रदूषण कमी करण्यासाठी जागतिक बँकेने विशेष निधी मंजूर केला आहे. जागतिक बँकेचे हंगामी संचालक पॉल प्रोसी यांनी काल याची घोषणा केली. या निधीतून उत्तर प्रदेश सरकारला २९ कोटी डॉलर्स आणि हरयाणा सरकारला ३० कोटी डॉलर्स मिळणार आहेत. या निधीचा वापर प्रदूषण नियंत्रण, राज्यातल्या स्वच्छता मोहीमा, तसंच विजेवर चालणाऱ्या सार्वजनिक वाहनांसाठी होणार आहे.

<><><><><>

गोवा नाइट क्लब आग प्रकरणातले आरोपी आणि क्लबचे भागीदार सौरभ लुथरा आणि गौरव लुथरा या दोघांना थायलंड पोलिसांनी आज ताब्यात घेतलं. गोव्यातल्या अरपोरा इथल्या क्लबमध्ये गेल्या शनिवारी आग लागून २५ जणांचा मृत्यू झाला होता, त्यानंतर लुथरा बंधू थायलंडला पळून गेले होते. त्यांच्या विरोधात इंटरपोलनं 'ब्लू कॉर्नर नोटिस' जारी केली होती. भारत सरकारच्या विनंतीवरून आज त्यांना फुकेत इथून ताब्यात घेण्यात आलं आणि त्यांना भारतात परत आणायची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.

दरम्यान, गोवा सरकारकडून मिळालेल्या प्रस्तावावरून या दोघांची पारपत्रं रद्द करण्याचा विचार सुरु असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं सांगितलं.

<><><><><>

तामिळनाडूच्या पर्यावरण, हवामान बदल आणि वन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव सुप्रिया साहू यांना UNEP, अर्थात संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम २०२५ चा 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' हा पुरस्कार जाहीर झाला आहे. सुप्रिया साहू, या पर्यावरण विषयक अत्यंत गंभीर मुद्द्यांवर काम करणाऱ्या आघाडीच्या कार्यकर्त्यांपैकी एक आहेत. आपल्या कामाप्रति असलेली त्यांची प्रेरणा आणि प्रत्यक्ष कृती, यासाठी UNEP नं या पुरस्कारासाठी त्यांची निवड केली आहे.

एकात्मिक प्रशासन आणि निसर्गावर आधारित उपायांचा अल्प आणि उच्च स्तरावरच्या तंत्रज्ञान आधारित उपायांशी मेळ घालून, कार्बन उत्सर्जन कमी करण्याबरोबर, असुरक्षित समुदायांचं रक्षण कसं करता येईल, हे सिद्ध करण्यासाठी साहू यांनी विविध उपक्रम हाती घेतले आहेत.

<><><><><>

दहशतवादी कारवायांना पैसा पुरवठा प्रकरणी ठाणे जिल्ह्यात पडघा इथं सक्तवसुली संचालनालय आणि दहशतवाद विरोधी पथकानं आज सकाळी छापेमारी केली. यावेळी पडघा परिसरातल्या काही घरांमध्ये केलेल्या तपासात इलेक्ट्रॉनिक उपकरणं आणि बनावट कागदपत्र जप्त करण्यात आल्याचं संबंधित सूत्रांनी सांगितलं.

<><><><><>

छत्तीसगडच्या बस्तर इथं आजपासून तीन दिवस बस्तर ऑलिम्पिक स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेचं उद्घाटन मुख्यमंत्री विष्णुदेव साय करतील. ऑलिम्पिक पदकविजेती मुष्टियोद्धा मेरी कोम आज या कार्यक्रमात सहभागी होईल. स्पर्धेचा समारोप केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते १३ डिसेंबरला होणार आहे. प्रसिद्ध फुटबॉलपटू, भारतीय संघाचा माजी कर्णधार बायचुंग भुतिया या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहे.

**<><><><><>**

क्रिकेटमध्ये भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका दुसरा टी-२० सामना आज चंडीगड इथं होणार आहे. संध्याकाळी ७ वाजता सामन्याला सुरुवात होईल. पाच सामन्यांच्या या मालिकेत भारत सध्या १-०नं आघाडीवर आहे.

**//<><><><><>//**